**L. A. BILL No. IX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PARAGANA AND KULKARNI WATANS (ABOLITION) ACT, THE MAHARASHTRA SERVICE INAMS (USEFUL TO COMMUNITY) ABOLITION ACT, THE MAHARASHTRA MERGED TERRITORIES MISCELLANEOUS ALIENATIONS ABOLITION ACT, THE MAHARASHTRA INFERIOR VILLAGE WATANS ABOLITION ACT AND THE MAHARASHTRA REVENUE PATELS (ABOLITION OF OFFICE) ACT, 1962.

(शा.म.मु.) एचबी ५०४-१ (२०५-७-२०२१)

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.

## महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२, यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९५० चा ६०.
१९५३ चा ७०.
१९५५ चा २२.
१९५९ चा १.
१९६२ चा महा. ३५.

### प्रकरण एक

### प्रारंभिक.

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

### प्रकरण दोन

### महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, याच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५० चा ६०.

" परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " गुंठेवारी विकास अधिनियम " असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

२०२१ चा महा.
२००१ चा महा. २७.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, “ अशा जमिनीचे बाजार मूल्य ” याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे. ”.

## प्रकरण तीन

### महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम याची सुधारणा.

१९५३ चा ७०.

**३.** महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ५ ची सुधारणा.

२०२१ चा महा.

“ परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा

२००१ चा महा. २७.

भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश “ गुंठेवारी विकास अधिनियम ” असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, “ अशा जमिनीचे बाजार मूल्य ” याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे.”.

## प्रकरण चार

## महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६ मध्ये, पाचव्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५५ चा २२.

" परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " गुंठेवारी विकास अधिनियम " असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

२०२१ चा महा. २००१ चा महा. २७.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, " अशा जमिनीचे बाजार मूल्य " याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे.".

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या खंड (३) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " गुंठेवारी विकास अधिनियम " असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा

२०२१ चा महा. २००१ चा महा. २७.

जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, " अशा जमिनीचे बाजार मूल्य " याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे.".

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ ची सुधारणा.

१९५९ चा १. **६.** महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

२०२१ चा महा. " परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा
२००१ चा महा. २७. भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश 'गुंठेवारी विकास अधिनियम' असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, " अशा जमिनीचे बाजार मूल्य " याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे.".

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**७.** महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९६२ चा महा. ३५.

" परंतु तसेच, महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांइतक्या रकमेचे प्रदान न करता, कृषितर वापरासाठी अगोदरच हस्तांतरित करण्यात आला असेल, किंवा कृषितर वापरासाठी उपयोगात आणण्यात आला असेल आणि अशा जमिनीची किंवा भूखंडाची विभागणी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " गुंठेवारी विकास अधिनियम " असा करण्यात आला आहे) अन्वये नियमाधीन करण्यात आली असेल किंवा नियमाधीन करण्यात येत असेल, तेव्हा असे हस्तांतरण, गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी गुंठेवारी विकास अधिनियमाअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेबरोबरच अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्यावर, नियमाधीन करता येईल; आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, भोगवटादार, संहितेच्या तरतुदींनुसार, ती जमीन किंवा तो भूखंड भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण करील.

२०२१ चा महा.

२००१ चा महा. २७.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, " अशा जमिनीचे बाजार मूल्य " याचा अर्थ, संबद्ध वर्षासाठी याबाबतीत, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमांच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अशा जमिनीचे बाजार मूल्य, असा आहे आणि जेथे असे वार्षिक दर विवरणपत्र तयार करण्यात आले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तेथे त्याचा अर्थ, संबंधित जिल्ह्याच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकाकडून निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीचे मूल्य, असा आहे.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.]**

**[महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२, यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई